पुण्य नगरी

सोमवार, १ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद 'मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन

**कोल्हापूर :** हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये जिमखाना विभागामार्फत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. प्राचार्य आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, सुरेश चरापले आदी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, २ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये जिमखाना विभागामार्फत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य कुंभार, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती, निर्माल्य संकलन

कोल्हापूर, ता. ३ : येथील विवेकानंद महाविद्यालयातील ज्युनिअर व सीनिअर एनएसएस विभागातर्फे कसबा बावडा येथील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन केले. विसर्जनप्रसंगी नदीचे प्रदूषण टाळण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांनी निर्माल्याचे संकलन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे प्रा. ए. आर. घस, प्रा. एस. पी. केदारी, प्रा. एल. ई. मोन्हा यांनी संयोजन केले.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती संकलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर एनएसएस विभागामार्फत कसबा बावडा येथील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करण्यात आले. घरगुती गणपती विसर्जनप्रसंगी नदीचे पाणी प्रदूषण व पर्यावरण हानी टाळण्यासाठी विवेकानंद कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. विवेकानंद कॉलेजच्या मूर्तिदान आवाहनास कसबा बावड्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी संकलित केलेल्या मूर्ती महानगरपालिका प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या.

तरुण भारत संवाद
गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'तर्फे गणेशमूर्ती, निर्माल्य संकलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागामार्फत बावड्यातील पंचगंगा नदी घाट येथे गणेशमूर्ती व निर्माल्य संकलन करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संकलित मूर्ती महानगरपालिकाकडे सुपुर्द केल्या. या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली केले. यावेळी प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. खागडे प्रा. ए. आर. पस, प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. एल. ई. नरोन्हा यांनी केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजला टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी विजेतपद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या महानगरपालिकास्तर टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या १९ वर्षाखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतपद मिळवले. संजीवन स्कूल हॉल, रंकाळा येथे ही स्पर्धा झाली.

मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात न्यू हायस्कूल संघाचा २-० ने पराभव केला, तर मुलींनी डी. वाय. पाटील कॉलेजचा २-० ने पराभव करीत विजेतपद मिळवले.

मुलांच्या संघामध्ये ईशान सुभाष पटेल, केतन विनायक सुतार, वेदांत राजेंद्र पाटील, शिवम राजू गुप्ता, सोहम शिवकुमार चव्हाण यांचा, तर मुलींच्या संघामध्ये निहाली निवास पाटील, माही पुष्कराज जनवाडकर, संस्कृती शैलेश थोरात, समिक्षा युवराज पोवार, समृद्धी संदीप हजारे यांचा समावेश होता.

संघातील खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी. ई. ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर
शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये सुशीलादेवी साळुंखे यांची जयंती साजरी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजमधील सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, महिला सबलीकरण कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुशीलादेवी साळुंखे यांची ९८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. यानिमित्त विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. शिल्पा भोसले यांनी स्वागत केले. पाहुण्यांची ओळख डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी करून दिली. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. गीतांजली साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, प्रा. पल्लवी देसाई, एस. के. धनवडे उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५

# सुशीलादेवी साळुंखेंचे समर्पण अंगिकारावे

## जयसिंगराव सावंत यांचे प्रतिपादन : स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या मागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था उभारणीच्या कामात त्यांनी बहुमोल मदत केली. त्यामुळे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचे समर्पण विद्यार्थ्यांनी अंगिकारावे, असे प्रतिपादन जयसिंगराव सावंत यांनी केले.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात बोलताना जयसिंगराव सावंत. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

विवेकानंद कॉलेजमधील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, महिला सबलीकरण कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे : प्रेरणादायी जीवनप्रवास हा त्यांच्या विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते.

सावंत म्हणाले, विवेकानंद शिक्षण संस्थेचा महाराष्ट्रभर शाखाविस्तार झाला. त्यामुळे संस्थेच्या विकासात त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. विद्यार्थिनींनी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांचा आदर्श घेऊन आयुष्य घडवावे.

कौस्तुभ गावडे म्हणाले, संस्थामाता ही गुरुदेव कार्यकर्त्यांनी दिलेली पदवी आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेप्रमाणे संस्थामातांनी त्यागमय जीवन व्यतीत केले. संस्थेत शिकणाऱ्या मुलांवर स्वतःच्या मुलांपेक्षा त्या जास्त प्रेम करत असत. स्त्रीवाद समजून घ्यायचा असेल तर संस्थामातांना समजून घेणे गरजेचे आहे.

प्रा. शिल्पा भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. गीतांजली साळुंखे यांनी आभार मानले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, प्रा. पल्लवी देसाई, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.



कोल्हापूर : महापालिका स्तरावरील टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी विजेतेपद मिळवलेल्या खेळाडूंबरोबर प्रशिक्षक.

# मनपा स्तर टेबल टेनिस स्पर्धेत 'विवेकानंद'ला दुहेरी विजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

- विवेकानंद संस्थेकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

कोल्हापूर महानगरपालिका आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांच्यावतीने संजीवन स्कूल हॉल रंकाळा येथे टेबल टेनिस स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद मिळवले. विजेते पद मिळवताना मुलांनी अंतिम सामन्यात न्यू हायस्कूल संघाचा पराभव तर मुलींनी डी. वाय. पाटील कॉलेजचा पराभव करीत विजेतेपद मिळविले.

संघातील खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

**विजेता मुलांचा संघ :** ईशान पटेल, चेतन सुतार, वेदांत पाटील, शिवम गुप्ता, सोहम चव्हाण. **विजेता मुलींचा संघ :** निहाली पाटील, माही जनवाडकर, संस्कृती थोरात, समीक्षा पोवार, समृद्धी हजारे.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ८ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजला टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी विजेतेपद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने संजीवन स्कूल हॉल रंकाळा, येथे घेण्यात आलेल्या महानगरपालिकास्तर टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या संघाने विजेतेपद मिळविले. विजेतेपद मिळविताना मुलांनी अंतिम सामन्यात न्यू हायस्कूल संघाचा २-० ने तर मुलींनी डी. वाय. पाटील कॉलेजचा २-० ने पराभव केला.



संघातील खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन तर प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. समीर पवार, प्रा. प्रशांत कळके, प्रा. साद मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी बुधवार, १० सप्टेंबर २०२५





कोल्हापूर : मनपास्तर नेहरू हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकावत विभागीय स्पर्धेत पात्र ठरलेले विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंका कॉलेजचे संघ.

# विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंकाला विजेतेपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मनपास्तर शासकीय शालेय नेहरू हॉकी स्पर्धेला मंगळवारी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर प्रारंभ झाला. अंतिम फेरीत विवेकानंद कॉलेज, पद्माराजे हायस्कूल, विमला गोयंका संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. तिन्ही संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन सचिन पांडव, मोहन भांडवले, सागर जाधव, महेश सूर्यवंशी, प्रदीप पोवार, समीर भोसले,

**मनपास्तर नेहरू हॉकी स्पर्धा**

सिद्धी पाटील, योगेश माने, आर. डी. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाले.

१५ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज संघाने विमला गोयंका इंग्लिश स्कूलच्या एकमेव गोलने पराभव केला. मिहीर इंगवलेने विजयी गोल केला. विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज संघात अथर्व आळवेकर, शौर्य टिपुगडे, वेदांत नारायणपुरे, यशवर्धन मुर्वे, मिहीर इंगवले, पुष्कराज मोहिते, पारस पिसाले, आयुष लोहार, आद्य मुळीक, अवनीश जाधव, सोहम निकम, रिषभ सासणे, सुयोग वेकनाळकर, वीर पटवणे, वरदराज पाटील, दानीश मण्णेर यांचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने महावीर इंग्लिश स्कूलचा ३-० गोलने पराभव केला. महावीर इंग्लिश स्कूलच्या प्रसिद्धी कांबळे हिने ३ गोल नोंदवले. विजयी संघात श्रुतिका, श्रेया, कृत्वी, गायत्री, मधुरा, कार्तिकी, प्रसिद्धी, दिया, केतकी, स्वरूपा, कृत्वा, तनिष्का, इरा, अर्पिता, वैष्णवी, ऋतुजा या मुलींचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेज संघाने सौ. स. म. लोहिया हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज संघाचा ५-० असा पराभव केला. विवेकानंद कॉलेज संघाकडून मुजमिल बाबाखान याने ३, पीयूष करडे याने २ गोल केले.

विजयी संघात वीर पाटील, हर्षवर्धन सुतार, अंकुश महेंद्रकर, श्रीतेज कोरेगावकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, शिवराज दिवे, मुजमिल बाबाखान, मयंक नलगे, पीयूष करडे, तनिष्क कुडाळकर, गुरुराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव, आयुष हयळ, पार्थ तोडकर यांचा समावेश होता.

P

दैनिक महासत्ता इचलकरंजी

कोल्हापूर, बुधवार, १० सप्टेंबर २०२५

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत १९ रोजी उद्योजक मेळावा

कोल्हापूर,ता.९(प्रतिनिधी)-

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर व दे आसरा फाउंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, ता. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम विनामुल्य असून नोंदणी आवश्यक आहे. ज्यांना व्यवसाय सुरु करायचा आहे आणि ज्यांचा व्यवसाय सुरु आहे अशा इच्छुक उद्योजक, नवउद्योजकांनी https://forms.gle/M1nWMzbT93GYijEm9 या गुगल फॉर्म मध्ये नोंदणी करुन मेळाव्यास उपस्थित रहावे. तसेच अधिक माहितीसाठी ०२३१-२५४५६७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

लोकमत
कोल्हापूर, बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये १९ला उद्योजक मेळावा

कोल्हापूर : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दे आसरा फाउंडेशन व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने १९ ला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन येथे उद्योजक मेळावा होणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून नोंदणी आवश्यक आहे. अनिल वाडीकर मार्गदर्शन करतील. उद्योजक कट्टांतर्गत महेश तोरगळकर यांच्याशी चर्चा होणार आहे. स्वयंरोजगारविषयक कर्ज देणारे महामंडळांचे स्टॉल लावण्यात येतील. इच्छुक उद्योजक, नवउद्योजकांनी https://forms.gle/M1nWMzbT93GVIjEm9 यामध्ये नोंदणी करून उपस्थित राहावे, असे आवाहन जमीर करीम यांनी केले आहे.

पुण्य नगरी
बुधवार, १० सप्टेंबर २०२५ | कोल्हापूर

# 'स्वामी विवेकानंद 'मध्ये १९ रोजी उद्योजक मेळावा

**कोल्हापूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दे आसरा फाऊंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवन, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून, नोंदणी आवश्यक आहे. विविध क्षेत्रांतील सूक्ष्म, लघु व नवउद्योजक एकत्र आणून ज्ञानाची देवाणघेवाण करणे, नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच व्यवसाय वाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे. यावेळी अनिल वाडीकर, उद्योजक महेश तोरस्कर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच स्वयंरोजगारविषयक कर्ज देणाऱ्या सर्व शासकीय महामंडळांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत.

तरुण भारत संवाद
बुधवार, १० सप्टेंबर २०२५

# पद्मराजे, गोयंका, विवेकानंद कॉलेजला अजिंक्यपद




कोल्हापूर : १७ वर्षाखालील मुलींच्या गटात अजिंक्यपद मिळवलेला प्रिन्सेस पद्मराजे गर्ल्स हायस्कूलचा संघ. २) १७ वर्षाखालील मुलांच्या गटात जेतेपद मिळवलेला विवेकानंद ज्युनिअर कॉलेजचा संघ

## मनपास्तरीय शासकीय शालेय नेहरु चषक हॉकी स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर मनपास्तरीय शासकीय शालेय नेहरू चषक हॉकी स्पर्धेत १५ वर्षाखालील मुलांच्या गटात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेज, १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रिन्सेस पद्मराजे गर्ल्स हायस्कूलने तर १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने अजिंक्यपद पटकावले. कोल्हापूर महानगरपालिका आणि कोल्हापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यातीने या हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियममध्ये ही स्पर्धा झाली.

१५ वर्षाखालील मुलांच्या गटात झालेल्या अंतिम सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजने विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलचा १-० गोलने पराभव करत जेतेपद पटकावले. विमला गोयंका कॉलेजला जेतेपद मिळवून देण्यासाठी मिहिर इंगवलेने केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात प्रिन्सेस पद्मराजे गर्ल्स हायस्कूलने महावीर इंग्लिश मीडियम स्कूलला ३-० गोलने पराभूत करत विजेतेपद पटकावले. पद्मराजे गर्ल्स हायस्कूलला विजेतेपदाचा सरताज मिळवून देण्यासाठी प्रसिद्धी कांबळे हिने गोलची हॅट्ट्रीक नोंदवली.

स्पर्धेतील १५ वर्षाखालील मुलांच्या गटात झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजने दत्ताबाळ हायस्कूलवर १-० गोलने विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात विमला गोयंका इंग्लिश मीडीयम स्कूलने न्यू हायस्कूलचा टायब्रेकरमध्ये ३-२ गोलफरकाने पराभव करत अंतिम फेरी गाठली. सामना पूर्ण वेळेत गोलशुन्यबरोबरीत सुटला होता. त्यामुळे सामना विजयाचा फैसला करण्यासाठी टायब्रेकरचा अवलंब केला होता.

१७ वर्षाखालील मुलांच्या झालेल्या सामन्यात विवेकानंद ज्युनिअर कॉलेजने न्यू हायस्कूलला २-० गोलने पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश केला. विवेकानंद कॉलेजला सामन्यात विजयी करण्यासाठी शिवराज दिवे याने पहिला तर पियूष करडे याने दुसरा गोल नोंदवला. विवेकानंद ज्युनिअर कॉलेज आणि स. म. लोहिया हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज यांच्यात अंतिम सामना झाला. यात विवेकानंद कॉलेजने ३-० गोलने विजय मिळवत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. विवेकानंद कॉलेजला अजिंक्यपदी विराजमान करण्यासाठी मुजमिल बाबाखानने २ तर पियूष करडेने १ गोल केला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कोल्हापूर जिल्हा हॉकी असोसिएशनचे अध्यक्ष विजय साळोखे-सरदार, क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, हॉकी प्रशिक्षक मोहन भांडवले, माजी राष्ट्रीय हॉकीपटू नजीर मुल्ला, प्रशिक्षक सागर जाधव, महेश सूर्यवंशी, प्रदीप पोवार, आर. डी. कुलकर्णी, समीर मोसले, सिद्धी पाटील, योगेश माने यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धा विजेता विमला गोयंका ज्युनिअर कॉलेजचा संघ**

अर्जुन आडनेकर, सुधीम बेकनाळकर, शौर्य टिपुगडे, वेदांत नारायणपुरे, वीर पटवणे, वरदराज पाटील, रिषभ सासने, यशवर्धन सुर्वे, मिहीर इंगवले, पुष्कराज मोहिते, पारस चिरमी, दानिश मणेर, आयुष लोहार, आदय मुळीक, अवनीश जाधव, सोहम निकम.

**स्पर्धा विजेता प्रिन्सेस पद्मराजे गर्ल्स हायस्कूलचा संघ :**

प्रसिद्धी कांबळे, श्रेया खराडे, श्रुतिका पाटील, वैष्णव लिंगडे, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, आर्वी सांगळे, ऋतुजा कुंभार, ऋचा पंकज सांगळे, इरा जाधव, अर्पिता लोंढे, मधुरा भोसले, स्वरुपा पोवार.

**स्पर्धा विजेता विवेकानंद ज्युनिअर कॉलेज :**

अंकुश महेंद्रकर, शिवराज दिवे, श्रीतेज कोरेगेकर, हर्षवर्धन सुतार, सार्थक राणे, वीर पाटील, मुजमिलखान बाबाखान, मयंक नलगे, पियूष करडे, तनिष्क कुडाळकर, गुरुराज टिपुगडे, गणेश तोंडांडे, आराध्य जाधव, आयुष हावळ, पार्थ लोडकर.

तरुण भारत संवाद

शनिवार १३ सप्टेंबर २०२५

# 'स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करा'

कोल्हापूर : राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधुभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसीत करावेत. स्वामी विवेकानंदांचे आचार व विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत व आपल्या देशाचा अधिक विकास करावा, असे मत विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी व विश्वबंधुता दिना निमित्त बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

कुंभार म्हणाले, महाविद्यालयाचे काम करत समाजापर्यंत पोहोचण्यासाठी रा.से.योजनेचे कार्य उपयोगी पडते. एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण होते. माणसाला माणसाशी माणसासारखे जगायला एन.एस.एस. शिकवते. बलवान राष्ट्राची निर्मिती युवा शक्तीद्वारे केली जाते. स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. डॉ. जी. एस. उबाळे व प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रविण बागडे, डॉ. राजश्री पाटील, स्वयंसेवक उपस्थित होते.

पुण्यनगरी
शनिवार, १३ सप्टेंबर २०२५

# प्रा. सुप्रिया पाटील यांना पीएच.डी.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या (अधिकारप्रदत्त स्वायत्त) प्रा. सुप्रिया मोहन पाटील यांना शिवाजी विद्यापीठाकडून नुकतीच इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या 'फॉर्म ॲज स्टेटमेंट : ए स्टडी ऑफ नरेटिव्ह स्ट्रक्चर्स अँड स्ट्रॅटेजिज इन अनिता नायर्स सिलेक्टेड नॉव्हेल्स' या प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली. यासाठी त्यांना प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

## संक्षिप्त

### 'सेवा, बंधुभाव ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेत काम करावे'

कोल्हापूर : राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधुभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसित करावेत. एनएसएसच्या माध्यमातून मानसिक, बौद्धिक, सामाजिक विकास होतो, असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी केले. विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले, महाविद्यालयाचे काम करत समाजापर्यंत पोहोचण्यासाठी रा. से. योजनेचे कार्य उपयोगी पडते. माणसाला माणसाशी माणसासारखे जगायला एन.एस.एस. शिकवते. पार्थ आष्टेव व श्वेता पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. टी. दांगट यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रवीण वागडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. जी. एस. उबाळे उपस्थित होते.

# पंचगंगा नदी घाटावर स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गणेश उत्सवातील घरगुती गणेश विसर्जनानंतर घाटावरचे पाणी कमी झाल्याने काही गणपती मूर्ती घाटावर दिसू लागल्या होत्या. हिंदुत्ववादी संघटनांनी जबाबदारी स्वीकारून सलग दोन दिवस पंचगंगा नदी घाटावर स्वच्छता मोहीम राबवून नदी घाट पूर्ण स्वच्छ केला.

या स्वच्छता मोहिमेत कोल्हापुरातील हिंदुत्ववादी संघटना, पंचगंगा आरती महामंडळ, बुधवार पेठेतील नागरिक व महावीर कॉलेज (एनएसएस विभाग), राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज (एनएसएस विभाग), शहाजी कॉलेजचे (एनसीसी विभाग) विद्यार्थी तसेच कोल्हापूर महानगरपालिकेचे कर्मचारी हेदेखील सहभागी झाले होते.

यावेळी सुशील भांदिगरे, महेश कामत, दीपक देसाई, सुधाकर भांदिगरे, पप्पू शेठ, राजेंद्र बुचडे, चंद्रकांत हंडे, गणेश जाधव, कपिल सूर्यवंशी, शशिकांत जाधव, संदीप कुंभार आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : पंचगंगा नदी घाटावर विविध संघटनांच्या वतीने दोन दिवस स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

पुण्य नगरी ▪ रविवार, १४ सप्टेंबर २०२५

# सेवाभाव ठेवूनच राष्ट्रीय सेवा योजनेत काम करावे

## अरुण कुलकर्णी; 'विवेकानंद'मध्ये एन.एस.एस.चे उद्घाटन

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधुभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वतःमध्ये नेतृत्वगुण विकसित करावेत. स्वामी विवेकानंदांचे आचार व विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. समाजसेवा म्हणजे फक्त श्रमदान नसून सर्वगुणसंपन्न बनण्याची संधी आहे, असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी केले.

स्वामी विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी व विश्वबंधुता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केंद्र संचालक अरुण कुलकर्णी.

पार्थ जाधव व श्वेता पाटील या विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. रोपास पाणी घालून व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रवीण वागडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. जी. एस. उबाळे व स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, १४ सप्टेंबर २०२५

# 'लैंगिक छळाबाबत पारदर्शक संवाद गरजेचा'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक छळाबाबत जागरूकता आवश्यक असून पारदर्शक संवाद गरजेचा आहे असे प्रतिपादन डॉ. अस्मिता पाटील यांनी केले.

विवेकानंद कॉलेज येथे अंतर्गत तक्रार समितीचे कार्य व भूमिका या विषयावर व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील यांनी या समितीची रचना व सुरुवात कशी झाली व समितीचे कार्य कसे चालते, समितीला असलेले अधिकार, २०१३ चा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा या संदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. उर्मिला खोत यांनी स्वागत केले. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. नीता पाटील यांनी केले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, प्रा. सृष्टी कोरे, प्रा. मंगेश खोले उपस्थित होते.

# रामदास आठवले आज कोल्हापूर दौऱ्यावर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले रविवारी (दि. १४) कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा सविस्तर दौरा पुढील प्रमाणे.

सकाळी १०.३० वाजता विमानतळावर आगमन. सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद कॉलेज, नागाळा पार्क येथे दिव्यांग सक्षमीकरणासाठी सहाय्यक उपकरणे आणि साधनांचे वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हुपरी येथे महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. दुपारी ४.३० वाजता दसरा चौक येथील कार्यक्रमास उपस्थिती. रात्री ७ वाजता ते कराडकडे प्रयाण.

6.9.25

पुण्य नगरी | रविवार, १४ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये 'तक्रार समिती'बाबत व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था) येथे अंतर्गत 'तक्रार समितीचे कार्य व भूमिका' या विषयावर डॉ. अस्मिता पाटील यांचे व्याख्यान झाले. त्यांनी समितीची रचना व सुरुवात कशी झाली, तसेच या समितीचे कार्य कसे चालते, याचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अंतर्गत समितीचे महत्त्व निर्विवाद असल्याचे मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. ऊर्मिला खोत यांनी केले. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. नीता पाटील यांनी केले. कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या प्रमुख डॉ. श्रुती जोशी, समिती सदस्य प्रा. सृष्टी कोरे, प्रा. मंगेश खोले आदी उपस्थित होते.

15/9/25

तरुण भारत संवाद

सोमवार १५ सप्टेंबर २०२५

# सुप्रिया पाटील यांना पीएच. डी.

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर ( अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील प्रा. सुप्रिया पाटील यांना शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विषयाची पीएच. डी. पदवी जाहीर केली आहे. त्यांनी "फॉर्म ॲज स्टेटमेंट: ए स्टडी ऑफ नॅरेटीव्ह स्ट्रक्चर्स ॲंड स्ट्रॅटेजिज इन अनिता नायर्स सिलेक्टेड नॉव्हेल्स" या विषयावर शोधप्रबंध सादर केला. या विषयासाठी



त्यांना डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, वडील मोहन पाटील, आई आशालता पाटील, बंधू मिथिलेश पाटील यांचे सहकार्य लाभले. तर स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

लोकमत
कोल्हापूर, सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : मिरजेत गुरुवारी मध्यवर्ती युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपद कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकाविले. जिल्ह्यातील ७९ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महोत्सवात भाग घेतला होता. येथील शिवराज विद्या संकुलात हा महोत्सव पार पडला. विजेत्या संघांची गुरुवारी (दि. १८) मिरज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

**कलाप्रकार आणि गुणानुक्रमे पहिले ५ विजेते असे** : लोकनृत्य - डी.के.टी.ई. इचलकरंजी, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**लोककला** - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, डी. आर. माने कॉलेज कागल. एकांकिका - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**प्रहसिका** - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य** - भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, आण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले, दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**पथनाट्य** : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज पेठवडगाव.

**समूहगीत** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद** - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, केआयटी कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, न्यू कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी (चंदगड). प्रश्नमंजुषा - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज.

**एकपात्री अभिनय** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल वुमेन्स कॉलेज कोल्हापूर, कला महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

**सुगम गायन** - देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरुकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व मराठी** : डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज कॉलेज गडहिंग्लज. वक्तृत्व हिंदी : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर. वक्तृत्व इंग्रजी - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरुड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज कोल्हापूर.

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, १५ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'चा डबल धमाका

## गडहिंग्लजला 'शिवराज'मध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव



गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात स्पर्धक विद्यार्थिनींनी कला सादर केली. (आशपाक किल्लेदार : सकाळ छायाचित्रसेवा)

■ सकाळ वृत्तसेवा

**गडहिंग्लज, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि येथील शिवराज महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ४५ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात झाला. कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने डबल धमाका केला. सांघिक व वैयक्तिक अशा दोन्ही गटांचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.**

दरम्यान, युवा महोत्सवात जिल्ह्यातील ७८ महाविद्यालयांचे १२८१ स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते. आवडत्या कला प्रकारात त्यांनी कलांचे सादरीकरण केले. प्रत्येक कला प्रकारातील पहिल्या पाच विजेत्यांची मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. मिरज (ता. सांगली) येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे कॉलेज येथे गुरुवारी (ता. १८) मध्यवर्ती युवा महोत्सव होणार आहे. कला प्रकारनिहाय अनुक्रमे विजेते असे...

**लोककला** - सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, दि न्यू कॉलेज, कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, डॉ. आर. माने आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज, कागल.

**प्रहसिका** - देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

**मूकनाट्य**- भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, अण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स कॉलेज हातकणंगले, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**पथनाट्य**- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगाव.

**भारतीय समूहगीत** - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

**वादविवाद** - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी.

**प्रश्नमंजूषा**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

**एकपात्री अभिनय**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्स महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

**सुगम गायन**- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरूकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व मराठी**- डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज.

**वक्तृत्व हिंदी**- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

### एकांकिका

■ देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

### लोकनृत्य

■ दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाइल अँन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

### वक्तृत्व इंग्रजी

■ विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'मध्ये 'अंतर्गत तक्रार समितीचे कार्य व भूमिका' विषयावर व्याख्यान



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था) येथे 'अंतर्गत तक्रार समितीचे कार्य व भूमिका' या विषयावर डॉ. अस्मिता पाटील यांचे व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.

डॉ. पाटील यांनी अंतर्गत तक्रार समितीची रचना, कार्यपद्धती, अधिकार व २०१३ चा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा याविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये या विषयाविषयी जागरूकता निर्माण होणे तसेच पारदर्शक संवाद होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांनी अध्यक्षीय भाषणात अंतर्गत तक्रार समितीचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी समितीकडे निर्भीडपणे मांडाव्यात असे आवाहन केले.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. उर्मिला खोत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नीता पाटील यांनी केले तर आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. श्रुती जोशी, समिती सदस्य प्रा. सृष्टी कोरे व प्रा.मंगेश खोले उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर
मंगळवार, १६ सप्टेंबर २०२५

# बुद्धिबळ स्पर्धेत महाडेश्वर, गोरे अजिंक्य

## मनपास्तरीय १९ वर्षांखालील शालेय स्पर्धा : शंतनू पाटील, सिद्धी वरपे उपविजेते

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महानगरपालिका, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सेंट झेवियर्स हायस्कूल आयोजित शासकीय शालेय १९ वर्षांखालील मुलांच्या बुद्धिबळ स्पर्धेत मानस महाडेश्वर, तर मुलींमध्ये प्रणाली गोरे यांनी अजिंक्यपद मिळविले. तर शंतनू पाटील व सिद्धी वरपे उपविजेते ठरले. स्पर्धा स्विस लीग पद्धतीने जलद बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय नियमानुसार घेण्यात आली.



कोल्हापूर : महानगरपालिकास्तरीय शालेय १९ वर्षांखालील बुद्धिबळ स्पर्धेतील विजेते खेळाडू, पंच आदी.

स्पर्धेत मुलांच्या गटात अंतिम सहाव्या फेरीनंतर तृतीय मानांकित डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या मानस महाडेश्वर याने सहा पैकी सहा गुण प्राप्त केले, तर अग्रमानांकित कोल्हापूर हायस्कूलच्या शंतनू पाटील गुणांसह उपविजेतेपद मिळविले. गोखले कॉलेजच्या श्रेयस बाबरकरने, साडेचार गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलच्या यश भागवत व शांतिनिकेतनच्या अक्षय निल्ले चार गुणांसह अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळविला.

मुलींच्या गटात राऊंड रॉबिन पद्धतीने एकूण सात फेऱ्यांत स्पर्धा झाली. अंतिम सातव्या फेरीनंतर विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या प्रणाली गोरे हिने सात पैकी साडेसहा गुण प्राप्त केले. पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या सिद्धी वरपे हिने साडेपाच गुणांसह उपविजेतेपद मिळविले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार ज्युनिअर कॉलेजच्या वैष्णवी काळे पाच गुणांसह तृतीय स्थानी राहिली. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या स्वरूपा हजारे चार गुण मिळवून चौथा, तर पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या आरोही जाधवने तीन गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला. स्पर्धेतील पाच खेळाडूंची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेसाठी क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, फिडे इन्स्ट्रक्टर मनीष मारुलकर, आरती मोदी, किरण खटावकर, राहुल मढे, सचिन भाट, प्रशांत पिसे, उत्कर्ष लोमटे, पल्लवी दिवाण, अल्ताफ कुरेशी, अनिश गांधी यांनी परिश्रम घेतले.

# राज्य बुद्धिबळ स्पर्धेसाठी ऋषीकेश कबनूरकची निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



राज्यस्तरीय खुल्या क्लासिक रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेसाठी कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याची निवड झाली आहे. निवड चाचणी स्पर्धा ११ ते १३ सप्टेंबर अखेर मुंबई येथे झाली. कबनूरकरने पुण्याच्या ओम लामके याचा पराभव करून ६.५ गुण प्राप्त केले. त्याला ४० फिडे गुण आणि दहा हजार रुपये, चषक देऊन गौरवण्यात आले.

या स्पर्धेत १२५ आंतरराष्ट्रीय फिडे मानांकित खेळाडूंसह एकूण १६४ खेळाडू सहभागी झाले होते. यातून चार खेळाडूंची राष्ट्रीय क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा २१ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान आंध्र प्रदेश येथे होणार आहे. ताराबाई पार्क येथील अनुज अ‍ॅकॅडमीमध्ये ऋषीकेश सराव करत असून, तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्यकार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कोंबळे, जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'च्या श्रीहरी शिपुगडे, वैष्णवी ढेंगे यांचे यश

कोल्हापूर : राष्ट्रीय थल सेना कॅम्पच्या माध्यमातून छात्रांच्या शारीरिक आणि मानसिक सक्षमतेची कसोटी आणि चाचण युनिट , बटालियन ग्रुप , डायरेक्टरेट आणि राष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. ही सर्व शिबिर कोल्हापूर अमरावती आणि दिल्ली येथे होतात. विवेकानंद कॉलेजमधील सार्जंट श्रीहरी शिपुगडेने ऑब्स्टॅकल व जेयुओ वैष्णवी ढेंगेने टेन्ट पिचिंग या प्रकारामधून



वैष्णवी ढेंगे



श्रीहरी शिपुगडे

दिल्लीच्या शिबिरापर्यंत यशस्वी वाटचाल केली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या देशभरातील १५ लाख मुलांमधून २५० छात्रांची निवड केली जाते. यामध्ये कोल्हापूरच्या मुलांनी यशस्वीतेची पताका फडकवली आहे. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार, एनसीसी विभाग प्रमुख मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलावडे, लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई पाच आणि सहा महाराष्ट्र बटालियन एनसीसी स्टाफ, पालक यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तीपत्रक प्रदर्शनाचे उद्घाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज मधील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ओझोन दिनी भित्तीपत्रक प्रदर्शन करण्यात आले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी 'ओझोन संवर्धन : पर्यावरण रक्षणाची ढाल' यावर आधारित भित्तीपत्रके सादर केली. विद्यार्थ्यांनी आकर्षक रेखाचित्रे, प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण मांडणीद्वारे ओझोनचे महत्त्व, त्यावरील धोके आणि त्याच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांवर प्रकाश टाकला. उद्घाटन डॉ. परशुराम शेळी यांच्या हस्ते करण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे : डॉ. मधुकर बाचूळकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वसुंधरेच्या रक्षणासाठी आपल्याकडे थोडाच अवधी राहिला आहे. आपण वेळीच सावध झाले पाहिजे. युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे, असे आवाहन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

डॉ. बाचूळकर म्हणाले, जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी २१०० मध्ये पृथ्वी मानवी वस्तीयोग्य राहणार नाही. मानवाने दुसऱ्या मानवी वस्तीयोग्य ग्रहाचा शोध घ्यावा, असे भाकित केले आहे. त्याची प्रचिती आपल्याला पावलोपावली येत आहे.

जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात जैवविविधतेचा ऱ्हास होताना उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. जागतिक तापमानवाढ आणि बदलते हवामान याचे गंभीर परिणाम आपण अनुभवतो आहोत. अंटार्क्टिका खंडावरील मोठ्या प्रमाणावर बर्फ वितळले असून, किनाऱ्यावरील देश जलमय होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ढगफुटी, अवकाळी पाऊस, भूस्खलन, महापुराच्या पाण्याने गावेच्या गावे वेढली जात आहेत. भूस्खलनामध्येही अनेक गावे गाडली गेली आहेत. प्रास्ताविक डॉ. एच. पी. पाटील यांनी केले. आभार डॉ. जी. एस. उबाळे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय प्रा. व्ही. एम. पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. निशा सुर्वे यांनी केले. यावेळी डॉ. वैशाली पालकर, प्रा. अश्विनी मुरावणे यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

पुण्य नगरी | गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद 'मध्ये भित्तीपत्रक प्रदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ओझोन दिनाचे औचित्य साधून भित्तीपत्रक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यामध्ये 'ओझोन संवर्धन : पर्यावरण संरक्षणाची गरज' या संकल्पनेवर आधारित भित्तीपत्रके सादर केली. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. परशुराम तेली (प्राणीशास्त्र विभाग, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, सांगली) यांच्या हस्ते करण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. कार्यक्रम आयोजनासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये इलेक्ट्रॉनिक्स् विभागातर्फे सेमिनार

कोल्हापूर : अभियांत्रिकी दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये सिनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभाग व बी.एससी.कॉम्प्युटर सायन्स एंटायर विभागातर्फे युगात एम्बेडेड सिस्टम डिझाईन या विषयावर सेमीनार झाले. डॉ. एस. ए. शिंदे, सहयोगी प्राध्यापक, इलेक्ट्रॉनिक्स् विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर होते तर विशेष वक्ते म्हणून श्री राहुल शिंदे , इंडस्ट्रियल आय.ओ.टी. कौन्सिलर, पुणे हे उपस्थित होते. या युगात एम्बेडेड सिस्टमची गरज व भविष्यातील संधी यावर विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. इलेक्ट्रॉनिक्स् विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी केली. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. जी. बी. जिरगे यांनी आभार मानले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स् विभागातील प्रा. आर. ए. देशमुख, आदी उपस्थित होते.




हॅलो प्रभात

# 'विवेकानंद' मध्ये आर.जी.चौगुले यांचा सेवानिवृत्ती समारंभ

कोल्हापूर : हॅलो प्रभात दि-18/5/25

आपण संस्थेचे आहोत, संस्थेने आपल्याला दिलेले काम प्रामाणिकपणे पार पाडा, तरच असा सन्मान मिळतो, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार यांनी केले. ते आर.जी.चौगुले यांच्या सेवानिवृत्ती सदिच्छा समारंभात बोलत होते. श्री.चौगुले यांनी तब्बल ३४ वर्षे महाविद्यालयात प्रामाणिक व एकनिष्ठ सेवा बजावली. त्यांच्या कार्यनिष्ठेचा गौरव करण्यासाठी महाविद्यालय व संस्थेकडून सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना श्री. चौगुले यांनी कृतज्ञतेने मनोगत व्यक्त केले आणि संस्थेने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात संस्था प्रार्थनेने झाली.

10:44

तरुण भारत
शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# 'युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे'

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगप्रसिध्द शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी सन २१०० मध्ये पृथ्वी मानवी वस्तीयोग्य राहणार नाही. तेव्हा मानवाने दुसऱ्या मानवी वस्तीयोग्य ग्रहाचा शोध घ्यावा असे भाकित केले आहे. त्याची प्रचिती आपल्याला पावलोपावली येत आहे. त्यामुळे युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.




कोल्हापूर : विवेकानंदमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. मधुकर बाचुळकर. सोबत डॉ. एच. पी. पाटील, प्रा. व्ही. एम. पाटील.

डॉ. बाचुळकर म्हणाले, वसुंधरेच्या रक्षणासाठी आपल्याकडे थोडाच अवधी राहिला आहे. जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात जैवविविधतेचा ऱ्हास होताना उघड्या डोळ्यांनी पहात आहे. स्वागत व प्रास्ताविक डॉ. एच. पी. पाटील यांनी केले. परिचय प्रा. व्ही. एम. पाटील यांनी करून दिला. सुत्रसंचालन डॉ. निशा सुर्वे यांनी केले. आभार डॉ. जी. एस. उबाळे यांनी मानले. यावेळी आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

शुक्रवार,
१९ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदच्या ४० विद्यार्थ्यांची मोफत प्रशिक्षणासाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाविद्यालयाच्या इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्हतर्फे बी. एससी. कॉम्प्युटर सायन्स, बी. सी. एस. व बी. सी. ए. च्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती क्युप स्पायडर्स कंपनीने घेतल्या. मुलाखतीमधून ४० विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या मोफत प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली.

या सर्व विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लठ्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५

# सुक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे मायक्रोटून, एक्सटेम्पर स्पर्धा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील सुक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय सूक्ष्मजीव दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी मायक्रोटून व एक्सटेम्पर स्पर्धेचे आयोजन केले होते. डॉ. एस. बी. मुल्ला यांच्या हस्ते उदघाटन झाले. प्रा. व्ही. एन. भोर, डॉ. एस. बी. मुल्ला यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धा संयोजनासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत
शनिवार, २० सप्टेंबर २०



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महापालिका स्तरावरील वुशू स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी पंच व मान्यवर.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मनपास्तरीय वुशू स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंदमध्ये वुशू स्पर्धा झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले.

कोल्हापूर महानगरपालिका क्रीडा निरीक्षक सचिन पांडव यांनी प्रास्ताविक केले. कोल्हापूर वुशू असोसिएशनचे अध्यक्ष अविनाश पाटील, डॉ. महेश कदम, लढू अंगज पंच व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोल्हापूर शहरातील जवळपास १६० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धा १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील व १९ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होते. स्पर्धेचे नियोजन प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. समीर पठाण, प्रा. साद मुजावर, सुरेश चरापले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यांनी केले. आभार प्रा. साद मुजावर यांनी मानले.

तरुण भारत शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये व्याख्यान

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात 'करिअर अपॉर्च्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी' या विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले. डॉ. बी. एस. पाटील यांनी नोकरीच्या संधीबद्दल मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन, फार्मास्युटिकल, इंडस्ट्रीयल क्षेत्रात असलेल्या संधी यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रा. डी. डी. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. के. के. मिसे यांनी मानले.

पुण्यनगरी
शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्ह

**मोफत प्रशिक्षणासाठी ४० विद्यार्थ्यांची निवड**

**कोल्हापूर :** महाविद्यालयाच्या इनक्युबेशन प्लेसमेंट ड्राईव्हतर्फे बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी.सी.एस. व बी.सी.ए.च्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती क्यूब स्पायडर्स कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घेतल्या. या कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी ॲप्टिट्यूट टेस्ट, ग्रुप डिस्कशन, व वैयक्तिक मुलाखती घेतल्या. यामधून ४० विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या मोफत प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. या विद्यार्थ्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, अंतर्गत मूल्यमापन हमी कक्षाच्या डॉ. श्रुती जोशी, प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण, डॉ. संजय लट्ठे, प्रा. संजय थोरात, डॉ. राजश्री पाटील, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. विजय पुजारी, डॉ. आशुतोष उपाध्ये, डॉ. अभिजित कासारकर, प्रा. वृषाली मिसाळ, प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# प्रा. सुप्रिया पाटील यांना इंग्रजीत पीएच.डी.

कंदलगाव : विवेकानंद कॉलेज, (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील प्रा. सुप्रिया मोहन पाटील यांना शिवाजी विद्यापीठाने



प्रा. सुप्रिया पाटील

इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या 'फॉर्म्स ॲन्ड स्टेटमेंट: ए स्टडी ऑफ नॅरेटिव्ह स्ट्रक्चर्स अँड स्ट्रॅटेजिज इन अनिता नायर्स सिलेक्टेड नॉव्हेल्स' या प्रबंधास पीएच. डी. ही पदवी प्रदान केली. त्यांना प्रा. डॉ. तृप्ती करेवाडी यांचे मार्गदर्शन, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कविता तिवडे, वडील मोहन पाटील, आई आशालता पाटील, मिथिलेश पाटील यांचे सहकार्य लाभले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

बातम्यांचा राजा
दैनिक जनप्रवास
सांगली | शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५



मिरजेतील युवा महोत्सवात आपली कला सादर करताना महाविद्यालयीन युवक.

# युवा महोत्सवाच्या माध्यमातून तरुणाईचा जल्लोष

जनप्रवास । मिरज

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयीन तरुणांचा विविध कलांद्वारे जल्लोष सुरू आहे. विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये अत्यंत पूर्वतयारीने उतरून आपल्या कला मोठ्या उत्साहात सादर करत आहेत.

पाच प्रकारातील ३६ स्पर्धा या तीन दिवसांमध्ये होत आहेत. आज पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत, लोकनृत्य, मूकनाट्य एकांकिका, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य एकल वादन, सुगम गायन, शास्त्रीय तालवाद्य, शास्त्रीय गायन, स्थळचित्रण, स्थळ छायाचित्रण, सांघिक रचनाकृती, कातरकाम, मेहंदी रचना, रांगोळी या सर्व स्पर्धांमध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व एका पेक्षा एक दर्जेदार कलाकृती सादर केल्या. लोकनाट्य व एकांकिका बालगंधर्व नाट्यगृहामध्ये झाल्या तर इतर स्पर्धा महाविद्यालयाची ग्रंथालय अभ्यासिका सभागृह व महाविद्यालय परिसरामध्ये पार पडल्या.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मधील व्याख्यानास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या वतीने करिअर अपॉर्च्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. एल.बी.एस. कॉलेज सातारा येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांनी बी. एस्सी व एम. एस्सी नंतर विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधींची माहिती दिली. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. डॉ. के. के. भिसे यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विभागप्रमुख डॉ. टी. सी. गौपाले यांचे मार्गदर्शन मिळाले.

पुण्य नगरी

शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# एमपीएससीत 'ईडब्ल्यूएस'मध्ये साक्षी कागले राज्यात पहिली



हुपरी : तळंदगे, ता. हातकणंगले येथील साक्षी कागले हिने खडतर परिश्रम व जिद्द यांच्या जोरावर एमपीएससी परीक्षेमध्ये ईडब्ल्यूएस महिला प्रवर्गातून राज्यात पहिला क्रमांक पटकावला. तिची राज्य कर निरीक्षकपदी, तसेच सहायक विभाग अधिकारी मंत्रालय मुंबई या पदावर नियुक्ती केली आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातील साक्षीचे प्राथमिक शिक्षण कुमार विद्यामंदिर तळंदगे, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज येथे झाले. राजाराम महाविद्यालय येथून गणित विषयात पदवी घेतल्यानंतर दोन वर्षांपासून पुणे येथे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी अभ्यास केला. पहिल्या प्रयत्नात तिने यश मिळवले. सध्या वर्ग एक पदासाठी अभ्यासाची तयारी सुरू आहे. आई संगीता कागले आणि खासगी कंपनीत काम करत असलेले वडील सुनील कागले यांचे प्रोत्साहन लाभल्याचे साक्षीने आवर्जून सांगितले.

पुण्य नगरी । शनिवार, २० सप्टेंबर २०२५

# वुशू स्पर्धेमध्ये 'स. म. लोहिया'चे यश

**कोल्हापूर :** जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद कोल्हापूर यांच्या वतीने विवेकानंद कॉलेज येथे घेण्यात आलेल्या शालेय वुशू स्पर्धेमध्ये सौ. स. म. लोहिया ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये १७ वर्षांखालील मुलांच्या ७० किलो वजन गटामध्ये कॉलेजचा खेळाडू पुरुषोत्तम प्रकाश पाटील याने सुवर्ण, तर आयुष सर्जेराव पाटील ५० ते ५५ किलो वजन गटामध्ये कास्यपदक मिळवले. यामधील पुरुषोत्तम पाटील याची विभागीय वुशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दोन्ही खेळाडूंना दि न्यू एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरचे गव्हर्निंग कौन्सिल सल्लागार विनोदकुमार लोहिया, अध्यक्ष निर्मलकुमार लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, दि न्यू एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी प्रभाकर हेरवाडे, एस. एस. चव्हाण, मुख्याध्यापिका एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. पी. नानिवडेकर, क्रीडाशिक्षक सचिन पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.



मिरज : युवा महोत्सवातील विजयी संघांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

# मिरजेच्या युवा महोत्सवात १७८ महाविद्यालयांचा सहभाग

मिरज : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात १७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. ही आजवरची विक्रमी नोंदणी आहे. येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात महोत्सवाची शनिवारी सांगता झाली. यानिमित्ताने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

स्पर्धेचा अंतिम निकाल असा : सरदार बाळासाहेब माने लोककला फिरता चषक : बळवंत कॉलेज (विटा), सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक : मुधोजी कॉलेज (फलटण), विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक : नृत्य विभाग : मुधोजी कॉलेज (फलटण), बळवंत कॉलेज (विटा), नाट्य विभाग : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), संगीत विभाग : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), कला विभाग : सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), वाङ्मय विभाग : राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे), वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण उपविजेतेपद फिरता चषक : दि न्यू कॉलेज (कोल्हापूर), प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), सांघिक स्पर्धा सर्वसाधारण उपविजेतेपद फिरता चषक : मुधोजी कॉलेज, अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).

पुढारी MY कोल्हापूर

रविवार, २१ सप्टेंबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालयातील सेमिनारला प्रतिसाद

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये सिनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभाग व बी.एससी. कॉम्प्युटर सायन्स एन्टायर विभागातर्फे आयक्यूएसी विभागाच्या सहकार्याने आयओटी व एआयच्या युगात एम्बेडेड सिस्टीम डिझाईन या विषयावर सेमिनार झाला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. ए. शिंदे उपस्थित होते. विशेष वक्ते म्हणून कौन्सिलर पुणे, राहुल शिंदे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. जी. बी. शिरगे यांनी आभार मानले.

# कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजला सांघिक सर्वसाधारण विजेतपद

## शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप; १७८ महाविद्यालयांनी नोंदवला सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मिरज :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात सुरू असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप शनिवारी झाला. कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. फलटणच्या मुधोजी महाविद्यालयास उपविजेतेपद मिळाले. वैयक्तिक स्पर्धेतील उपविजेतेपद कोल्हापूरच्याच न्यू कॉलेजने पटकावले. प्रमुख पाहुणे कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

यावेळी प्रा. शिर्के म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या कलेला व सुप्त गुणांना झळाळी देण्याचे कार्य युवा महोत्सव करतो. हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना जीवनात खूप पुढे नेते, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के यांनी काढले. ते म्हणाले, युवा महोत्सवाचे शिवधनुष्य साळुंखे महाविद्यालयाने पेलले. यावर्षी विक्रमी १७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. जिल्हास्तरीय स्पर्धा घेणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे योगदान आहे.



मिरजेतील साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचा समारोप झाला. कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजेत्या विवेकानंद महाविद्यालयाच्या संघाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित होते.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. विद्यापीठ गीताने व संस्थेच्या प्रार्थनेने समारोप सोहळ्याचा प्रारंभ झाला. यंदा प्रथमच झालेल्या शोभायात्रा स्पर्धेत १५ महाविद्यालयांनी 'पंढरीची वारी', 'आदिवासी नृत्य', 'जात-धर्म निरपेक्ष संस्कृती', 'जगात भारी कोल्हापुरी' या विषयांवर सादरीकरण केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन चव्हाण, प्रज्ञा माळकर व डॉ. टी. एम. चौगले यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग व डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय यांच्यातर्फे संयोजन करण्यात आले. प्रा. अर्जुन जाधव, डॉ. स्वाती हाके यांच्यासह सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

तरुण भारत सोमवार, २२ सप्टेंबर २०२५

# व्यावसायिक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी उद्योजक व्हावे

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ज्या प्रेरणेने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली, त्यामध्ये पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीला हातभार लावावा, अनेक उद्योजक तयार व्हावेत, अशी अपेक्षा होती. आज त्याच प्रकारे ही संस्था विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी देऊन स्वयंपूर्ण बनवित आहे. ही अत्यंत समाधानकारक बाबत आहे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मांडले.ते जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, कोल्हापूर व दे आसरा फाउंडेशन आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजक मेळाव्यात बोलत होते.

यावेळी अजय पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, उमेश पाटील, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी स्नेहा ननावरे, दे आसरा फाउंडेशन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनिल वाडीकर, ग्रोथ मार्केटींग तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. उद्योजग महेश तोरगलकर यांच्या मुलाखती नंतर युवा उद्योजकांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे पाहुण्यांनी दिली. तर आभार अमोल जाधव यांनी मानले. यावेळी डॉ. श्रुती जोशी, प्रा. सनी काळे, डॉ. उमेश दबडे, प्रा. डॉ. अमोल मोहिते, प्रा. आर. आर. माने, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

तरुण भारत

सोमवार, २२ सप्टेंबर २०२५

# जगातील २ टक्के संशोधकांत 'विवेकानंद'चे डॉ. संजय लट्ठे

- अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या ताज्या क्रमवारीत सलग सहाव्या वर्षी पुनर्मानांकन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जगभरातील आघाडीच्या २ टक्के संशोधकांची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. यात येथील विवेकानंद कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लट्ठे यांना सलग सहाव्या वर्षी पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गतवर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील २ टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीत डॉ. संजय लट्ठे यांना स्थान मिळाले होते. याही वर्षी त्यांना पुनर्मानांकन मिळाले आहे.

यावर्षी स्टॅनफोर्ड विद्यापीठाने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकाच्या सार्वकालिक कारकिर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे. दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे. 'स्कोपस' डाटाबेसवर आधारित या यादीसाठी १९६० ते २०२४ या कालावधीमध्ये संशोधकीय योगदान देणाऱ्या संशोधकांचा विचार करण्यात आला आहे.

डॉ. संजय लट्ठे यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या डॉ. श्रुती जोशी तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे आणि प्रशासक सचिन घनवट यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

हॅलो प्रभात

# महाराष्ट्र दिनमान पुरस्काराने प्रा. अभयकुमार साळुंखे यांचा गौरव

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांना महाराष्ट्र दिनमान सन्मान पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमा, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन प्राचार्य साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज होते, तर खासदार धनंजय महाडीक विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र दिनमानचा पहिला वर्धापन दिन हॉटेल सयाजी येथे साजरा करण्यात आला.




या प्रसंगी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला, चित्रपट व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

विजय पोरम्मारे यांनी प्रास्ताविक करताना साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यानंतर संस्थेचा विकास व प्रगती सचोटीने, कौशल्यपूर्ण प्रशासकीय नेतृत्वाखाली साध्य केला असल्याचे सांगितले.

श्री.शेलार म्हणाले, प्रा.अभयकुमार साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांतील ४५० हून अधिक शाखांचे कुशल नेतृत्व केले असून, शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र दिनमान सन्मान प्रदान करण्यात येत आहे, याचा मला अभिमान वाटतो. या समारंभात शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डी. वी. साळुंखे, डॉ. सुनिलकुमार लवटे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. संजय डी. पाटील, क्रीडापटू शैलजा साळोखे, हिंदकेसरी दीनानाथ सिंह, वैभव नायकवडी, गणी आजरेकर आदी मान्यवरांना गौरविण्यात आले. या सोहळ्यास पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी
नगरी
बुधवार, २४ सप्टेंबर २०२५ ॥ कोल्हापूर



# 'विवेकानंद'मध्ये एड्स जनजागृती

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबईतर्फे विवेकानंद महाविद्यालयात इंटेसिफाईड आयईसी कॅम्पेन अंतर्गत एचआयव्ही एड्स जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. यावेळी पंचगंगा रुग्णालयाच्या आयसीटीसी समुपदेशिका सुरेखा जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एचआयव्ही संसर्गाची कारणे स्पष्ट केली. एड्स प्रतिबंधासाठी जनजागृती मोहिमेत महाविद्यालयीन युवक-युवतींचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. एच. जी. पाटील यांनी केले. आभार प्रा. एस. पी. पंचभाई यांनी मानले. नियोजन आरआरसी नोडल ऑफिसर मेजर सुनीता भोसले यांनी, तर सूत्रसंचालन अंडर ऑफिसर सायली वडकर हिने केले. ज्युनिअर सायन्स विभागप्रमुख प्रा. एम. आर. नवले, प्रा. एस. एल. पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. पद्मजा पाटील, प्रा. शलाका मुठाणे आदी उपस्थित होते. प्रबंधक सचिन धनवडे आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत संवाद

बुधवार, २४ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये करिअरच्या संधीसंदर्भात व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र व बायोटेक्नोलॉजी विभागाच्या वतीने 'करिअर अपॉर्च्युनिटीज इन मायक्रोबायोलॉजी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. सातारा येथील एलबी कॉलेजमधील सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. पाटील यांनी नोकरीच्या संधीबद्दल मार्गदर्शन केले. शिक्षण, संशोधन, फार्मास्युटिकल, इंडस्ट्रीयल क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधी यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रा. व्ही. बी. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. के. के. भिसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. टी. सी. गौपाले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ TODAY

कोल्हापूर, शनिवार, २७ सप्टेंबर २०२५

# ऋग्वेद, भार्गवी, इंद्रनील, प्रणव आदींचे यश

## महापालिकास्तर शालेय नेमबाजी स्पर्धा : विविध गटांत शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : शालेय महापालिकास्तर नेमबाजी स्पर्धेत ऋग्वेद खोत, भार्गवी पाटील, इंद्रनील चाळके, प्रणव पवार आदींनी विविध गटांत पहिला क्रमांक पटकाविला.

दुधाळी शूटिंग रेंजवर झालेल्या या स्पर्धेत ओपन साईट एअर रायफल - चौदा वर्षांखालील गटात मुलांमध्ये ऋग्वेद खोत (राधाबाई शिंदे स्कूल), आरव भोसले (न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल), प्रणव बिराजदार (पोदार स्कूल), तर मुलींमध्ये भार्गवी पाटील (राधाबाई शिंदे स्कूल), स्वरा सुतार (महावीर इंग्लिश स्कूल), आर्णवी पाटील (छत्रपती शाहू विद्यालय).

सतरा वर्षांखालील गटात मुलांमध्ये इंद्रनील चाळके, अथर्व भुरले (छत्रपती शाहू विद्यालय), विदांत लेले (विमला गोयंका स्कूल), मुलींमध्ये सृष्टी हासगले (विमला गोयंका स्कूल) ऐश्वर्या जाधव (प्रायव्हेट हायस्कूल), स्नेहांकिता चौगुले (प्रिन्स शिवाजी इंग्लिश स्कूल).

एकोणीस वर्षांखालील गटात मुलांमध्ये प्रणव पवार (डॉ. डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज), शिवेंद्र खलकर (प्रिन्स शिवाजी इंग्लिश मिडियम स्कूल), प्रवीण ईंगळे (न्यू इंग्लिश मीडियम स्कूल), तर मुलींमध्ये श्रिया माने (डी. आर. के. कॉलेज), आदिती भंडारी (पद्माराजे हायस्कूल), जोया काझी (कमला कॉलेज).

पीपसाईट एअर रायफल : चौदा वर्षांखालील गटात मुलांमध्ये आयुष्मान दराडे (सेंट झेवियर्स स्कूल), राजवर्धन मोरे-पाटील (संजीवन स्कूल, पन्हाळा), समरजित लोंढे (शाहू विद्यालय), तर मुलींमध्ये आयुषी शिंदे (शांतिनिकेतन स्कूल).

पीपसाईट १७ वर्षांखालील मुलांमध्ये श्लोक गळत (सेवंथ डे स्कूल), वरदराज पोवार (प्रायव्हेट हायस्कूल), भूषण पाटील (विवेकानंद कॉलेज), तर मुलींमध्ये स्वरा मगदूम (डीआरके कॉलेज), हिरण्या सासने (प्रिन्स शिवाजी इंग्लिश स्कूल), निर्झरा पाटील (न्यू कॉलेज), तर मुलींमध्ये काव्यांजली नकाते (राजाराम महाविद्यालय), श्रीनिधी कोगनिळे (न्यू कॉलेज), रसिका कुसाळे (चाटे स्कूल ज्युनिअर कॉलेज).

एअर पिस्टल : १४ वर्षांखालील मुलांमध्ये आराध्या कांबळे, उन्नती जाधव, सारा गडकरी (सर्व विमला गोयंका इंग्लिश स्कूल). १७ वर्षांखालील गटात आदित्य वायचळ (स. म. लोहिया हायस्कूल), दर्श पाटील (पोदार स्कूल), वरद विभुते (न्यू इंग्लिश मीडियम स्कूल), तर मुलींमध्ये काव्यांजली बरगे (उषाराजे हायस्कूल), स्वरांजली जाधव (छत्रपती शाहूविद्यालय), प्रमला भोसले (एस. एल. जी. स्कूल).

१९ वर्षांखालील मुलांमध्ये ऋषिराज पाटील (न्यू कॉलेज), अथर्व कुंभार (गोपालकृष्ण गोखले कॉलेज), आदिनाथ जाधव (विवेकानंद कॉलेज), तर मुलींमध्ये गौरी चव्हाण, हर्षिका पटेल (न्यू मॉडेल ज्युनिअर कॉलेज), दिशा यादव (न्यू कॉलेज).

४ पुढारी MY कोल्हापूर · शनिवार, २७ सप्टेंबर २०२५

## संक्षिप्त

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास : डॉ. टी. एम. चौगुले

कोल्हापूर : विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व नेतृत्व गुण विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी समाजप्रिय होऊ शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित एन.एस.एस.च्या वर्धापन दिन व नशामुक्त अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. साक्षी क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांची ओळख डॉ. बी. टी. दांगट यांनी केली. नशामुक्त अभियानाची शपथ प्रा. ए. बी. वसेकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी डॉ. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, २८ सप्टेंबर २०२५

# राधाबाई शिंदे, डी. आर. के. कॉलेजचे यश

## मनपास्तर शालेय नेमबाजी स्पर्धा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मनपास्तर शालेय नेमबाजी स्पर्धेत राधाबाई शिंदे हायस्कूल व डी.आर.के. कॉलेजच्या खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली. दुधाळी मैदान येथील छत्रपती संभाजी महाराज नेमबाजी प्रशिक्षण केंद्रात ही स्पर्धा झाली.

**स्पर्धेचे विविध प्रकार आणि वयोगटाचा अनुक्रमे निकाल असा :** ओपन साईट एअर रायफल : १४ वयोगट - मुले - ऋग्वेद खोत (राधाबाई शिंदे), आरव भोसले (न्यू मॉडेल स्कूल), प्रणव बिराजदार (पोदार स्कूल). मुली : भार्गवी पाटील (राधाबाई शिंदे), स्वरा सुतार (महावीर स्कूल), अर्णवी पाटील (छ. शाहू). १७ मुले - इंद्रनील चाळके (छ. शाहू कॉलेज), अथर्व भुरले (छ.शाहू विद्यालय), वेदांत लेले (विमला गोयंका). मुली - सृष्टी हास्गले (विमला गोयंका), ऐश्वर्या जाधव (प्रायव्हेट हायस्कूल), स्नेहांकिता चौगुले (प्रिन्स शिवाजी). १९ मुले - प्रणव पवार (डॉ. डी. वाय. पाटील), शिवेंद्र खतकर (प्रिन्स शिवाजी), प्रसेन इंचाळे ( न्यू मॉडेल). मुली - श्रीया माने (डी.आर.के. कॉलेज), आदिती भंडारी (पद्माराजे), जोया काझी (कमला कॉलेज).

पीप साईट एअर रायफल : १४ मुले - आयुष्मान दराडे (सेंट झेवियर्स), राजवर्धन मोटे-पाटील (संजीवन स्कूल रंकाळा), समरजित लोंढे (छ. शाहू विद्यालय). मुली - आयुषी शिंदे (शांतिनिकेतन मोरेवाडी). १७ मुले - श्लोक राऊत (सेवंथ डे), वरदराज पोवार (प्रायव्हेट), भूषण पाटील (विवेकानंद कॉलेज). मुली : स्वरा मगदूम (डीआरके कॉलेज), हिरण्या मामने (प्रिन्स शिवाजी), निर्झरा पाटील (न्यू कॉलेज). १९ मुले - कविन कैंगनाळकर व दर्शन शिंदे (विवेकानंद कॉलेज), ऋषीकेश सरकार (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज). मुली - काव्यांजली नकाते (राजाराम कॉलेज), श्रीनिधी कोगनोळे (न्यू कॉलेज), रसिका कुमाळे (चाटे कॉलेज).

एअर पिस्तल : १४ मुले - अर्णव वागरे (सेंट झेवियर्स), समर्थ तवार (विकास विद्यामंदिर), गोवर्धन खोत (सांदिपनी विद्यालय). मुली - आराध्या कांबळे, उन्नती जाधव, सारा गडकरी (विमला गोयंका). १७ मुले - आदित्य वायचळ (म. म. लोहिया), दर्श पाटील (पोदार स्कूल), वरद विभुती (न्यू इंग्लिश संभाजीनगर). मुली - काव्यांजली बरगे (उषाराजे हायस्कूल), स्वरांजली जाधव (छ. शाहू विद्यालय), प्रसन्ना भोसले (मलग हायस्कूल). १९ मुले - ऋषीराज पाटील (न्यू कॉलेज), अथर्व कुंभार (गोखले कॉलेज), आदिनाथ जाधव (विवेकानंद). मुली - गौरी चव्हाण व हर्षिका पटेल (न्यू मॉडेल), दिशा यादव (न्यू कॉलेज).

पुण्य नगरी

रविवार, २८ सप्टेंबर २०२५



# व्हॉलीबॉल स्पर्धेत 'विवेकानंद' तृतीय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि जनता शिक्षण मंडळ देवचंद कॉलेज, अर्जुननगर यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयच्या महिला संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या यशामुळे संघाची वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे होणाऱ्या इंटरझोनल स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. यशस्वी कामगिरीत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.